## :– नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६०/२०१७ मधील नि. ८८ खालील आदेश –:

(आनंद नारायण सावंत व.५ विरुध्द रघुनाथ महादेव मोर्ये व.)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ब आणि १क यांनी निशाणी ८८ येथील फेरीस्तासोबत असलेली कागदपत्र अभिलेखावर दाखल करुन घेण्यात यावी याकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** प्रतिवादींचे कथन असे की, प्रस्तुत दाव्याचे कामी सोबतच्या फेरीस्तात दर्शविल्याप्रमाणे मौजे पाट फेरफार नं. ५६७८ हजर करीत आहेत. तरी न्यायपुर्ततेकरीता सदरील कागद दाव्याचे कामी दाखल करुन घेण्यात यावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

**०३.** प्रतिवादी क्र. १ब व १क यांनी सदर अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे. सदरचा अर्ज विलंबाने दाखल केला असून सदभावनेने दिलेला नाही.

**०४.** अर्ज व म्हणणे वाचून पाहीले, अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले, तसेच उभय पक्षकारांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादींनी सदर अर्जाच्या फेरीस्तासोबत दाखल केलेले कागदपत्र हे भारतीय पुरावा कायद्याचे कलम ७४ अन्वये सार्वजनिक दस्तऐवज आहे असे दिसून येते. तसेच, उभयपक्षकारा मधील असलेला वाद हा अंतिमरित्या न्यायनिर्णीत करण्याच्या दृष्टीने ते महत्वपुर्ण आहेत असे दिसून येते. सदरचे दस्तऐवज हे दाव्याचे कामी अभिलेखावर सामिल करुन घेतल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणारे नाही. त्यामुळे सदर दस्तऐवज सामिल करुन घेणे उचित होईल. सदरचा दस्तऐवज हा भारतीय पुरावा कायद्यातील तरतुदीप्रमाणे शाबीत करण्याची जबाबदारी दाखल करणा–या पक्षकारावर असते. तसेच भारतीय पुरावा कायद्यात दस्तऐवज संबंधीची दिलेली गृहितके सदरचे कागदपत्रातील मजकूर शाबीत झाला किंवा कसे हे अंतिम युक्तीवादाचे वेळी विचारात घेता येईल. त्यामुळे सदर दस्ताऐवजास अभिलेखावर दाखल

करुन घेण्याची परवानगी देणे मला उचित वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. नि. ८८ कडील अर्ज मंजुर करण्यात येत आहेत.

२. नि. ८९ च्या फेरीस्तासोबतचे कागपत्र अभिलेखावर हजर करुन घेण्यात येत आहेत.

Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2024.08.08 12:43:21 +0530

दिनांक– ०७/०८/२०२४ (प.रा.ढोरे)
कुडाळ सह.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,कुडाळ.